# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

# पोटनिवडणुक २०२० ची अधिसूचना

वाचा:- १) मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत केल्याचा आदेश क्र.एसईसी/१०९५/सिआर/५२/डी-३ दि.०६ जुन १९९५

२) मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत केल्याचा आदेश क्र.एसईसी/१०९४/१७५/१९९४ दि.०७ नोव्हेंबर १९९४

३) मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. रानिआ/मनपा/२०१६/प्र.क्र.१६/का-०५ दि. २६.१२.२०१६

४) राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र.रानिआ/मनपा-२०१९/प्र.क्र.१३/का-५ दिनांक ०४.०१.२०२०.

५) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडील पत्र क्र. २०२०/नपाप्र/आस्था-१/का.वि दि.०६.०१.२०२०.

६) या कार्यालयाचे आदेश क्र. नांवाशमनपा/निवडणुक/ ६२७ /२०२० दि. ०९.०१.२०२०.

क्रमांक जा.क्र.नांवाशमनपा/निवडणूक/ ६३७ /2020 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व सदर अधिनियमाच्या अनुसूची ड मधील निवडणूक नियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका (महानगरपालिकेच्या निवडणूका घेणे) (अनुसूची ड ची सुधारणा) नियम २००२ मधील तरतुदीनुसार मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्र.१३-ड च्या पोटनिवडणूक २०२० करिता खालील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम निश्चित करुन दिलेला असून, उपरोक्त आदेशातील तरतुदीनुसार मी, अरुण डोंगरे, आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड प्रभाग क्र.१३-ड च्या पोटनिवडणूक २०२० साठी खालील प्रमाणे निवडणूकीचा कार्यक्रम याद्वारे प्रसिध्द करीत आहे.

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १. | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी. | दि. १४/०१/२०२० (मंगळवार) सकाळी ११.०० ते दि. २१/०१/२०२० (मंगळवार) दुपारी २.०० पर्यंत |
| २. | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | दिनांक १४/०१/२०२० (मंगळवार) ते दिनांक २१/०१/२०२० (मंगळवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत)<br>दिनांक १९.०१.२०२० रोजी रविवार असल्याने नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाही. |
| ३. | नामनिर्देशनपत्रांची छाननी | दि. २२/०१/२०२० (बुधवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ४. | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | छाननी पुर्ण झाल्यानंतर लगेच |
| ५. | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दि. २४/०१/२०२० (शुक्रवार) (दुपारी ३.०० पर्यंत) |
| ६. | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दि. २५/०१/२०२० (शनिवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासुन) |
| ७. | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि. २५/०१/२०२० (शनिवार) |
| ८. | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि. ०६/०२/२०२० (गुरुवार) (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) |
| ९. | मतमोजणी व निकाल जाहिर करण्याचा दिनांक | दि. ०७/०२/२०२० (शुक्रवार) (सकाळी १०.०० पासून) |
| १०. | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे. | दि. १०/०२/२०२० (सोमवार) पर्यंत. |

वरील निवडणूकीचे कार्यक्रम पार पाडणेसाठी व निवडणूक कार्यक्रमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी संदर्भ क्र. ३ च्या आदेशातील तरतुदीनुसार खालील प्रमाणे निवडणूक निर्णय अधिका-यांची नेमणूक केलेली असून त्यांचे नांवे स्तंभ क्र.२ मध्ये दिलेली आहेत. तसेच त्यांना नेमून दिलेले प्रभाग स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविण्यात आलेले आहेत. त्याशिवाय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या मदतीसाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिका-यांची नेमणूक करण्यात आलेली असून त्यांचे नांव स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पदनाम | सहा.निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पदनाम | नेमून दिलेले प्रभाग क्रमांक व आरक्षणाचा तपशील | निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे कार्यालयांचे ठिकाण | मतमोजणीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | श्री लतीफ पठाण, उपविभागीय अधिकारी, नांदेड. | १.श्री. अरुण जराड, तहसीलदार, नांदेड.<br>२.श्री.गुलाम मुहमंद सादिक, सहाय्यक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर मनपा, नांदेड | १३ -ड - सर्वसाधारण मदीनानगर/चौफाळा. | निवडणूक विभाग, श्री.गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम परिसर, नांदेड. | श्री. गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम इमारत, पहिला मजला,पुर्वेकडील हॉल, नांदेड. |

उपरोक्त निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे रकाना क्रमांक ४ मधील संबंधीत प्रभागाची नामनिर्देशनपत्र दिनांक १४.०१.२०२० (मंगळवार) ते दि.२१.०१.२०२०

दै. वास्तवमंच (११) पान ६

# नांदेड मनपाच्या प्रभाग क्रं. १३ च्या पोटनिवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया आजपासून

नांदेड- नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र १३ (ड) च्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून त्यासाठी नामनिर्देशन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया मंगळवार दि. १४ जानेवारीपासून सुरू होणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या या पोटनिवडणूक कार्यक्रमानुसार मनपाच्या प्रभाग क्र. १३ ड, (मदिनानगर/चौफाळा) पोटनिवडणुकीसाठी दि. ६ फेब्रुवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून त्यासाठी नामनिर्देशनपत्राची विक्री व स्वीकारण्याची प्रक्रिया मंगळवार दि. १४ जानेवारी ते २१ जानेवारी २०२० पर्यंत दररोज सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. तसेच दि. २२ जानेवारी रोजी प्राप्त नामनिर्देशनपत्रांची छाननी होणार असून दि. २४ जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. तसेच निवडणूक रिंगणातील उमेदवारांना निवडणूक चिन्ह दि. २५ जानेवारी रोजी वाटप करण्यात येणार असून त्याच दिवशी उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर दि. ६ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार असून दि. ७ फेब्रुवारी रोजी त्याची मतमोजणी होणार आहे.

दरम्यान या पोटनिवडणूक निमित्ताने स्टेडियम परिसर येथे कार्यालय स्थापन करण्यात आले असून निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण व सहा. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार अरुण जऱ्हाड, मनपाचे सहाय्यक आयुक्त गुलाम सादेक यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

Postal, Regd.No. NND /391 / (2019 - 2021)

दै. सकाळ (१२)

# आजपासून अर्ज भरण्याची प्रक्रिया



## महापालिका प्रभाग १३ 'ड' पोटनिवडणूक

नांदेड, ता. १३ (बातमीदार) : नांदेड महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १३ - ड (मदिनानगर, चौफाळा) पोटनिवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याच्या प्रक्रियेला आजपासून (ता. १४) सुरुवात होणार आहे.

[illegible] मंगळवारपासून सुरुवात होणार असून ता. २१ जानेवारीपर्यंत दररोज सकाळी ११ ते दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. अर्जांची छाननी ता. २२ जानेवारी रोजी होणार आहे. उमेदवारी अर्ज ता. २४ जानेवारीपर्यंत मागे घेता येणार आहेत. निवडणूक चिन्ह ता. २५ जानेवारी रोजी नेमून देण्यात येणार आहे. अंतिम निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी याच दिवशी प्रसिद्ध होईल. [illegible] फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान होणार असून मतमोजणी ता. सात फेब्रुवारी रोजी होणार आहे.

यासाठी निवडणूक [illegible] स्टेडियम परिसरात निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय स्थापन करण्यात आले असून निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार अरुण जऱ्हाड आणि सहायक आयुक्त गुलाम सादेक हे काम पाहत आहेत.

दै लोकपत्र (9) पान (5)

# मनपाच्या पोट निवडणुकीसाठी आज १४ पासून नामनिर्देशनपत्र स्विकारले जाणार

नांदेड/प्रतिनिधी

नांदेड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. १३-ड मधील पोटनिवडणुकीसाठी दि. १४ जानेवारीपासून नामनिर्देशनपत्र दाखल केली जाणार आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्र.१३-ड, मदिनानगर/चौफाळा पोट निवडणूक २०२० करिता नामनिर्देशन पत्र भरण्यास दि. १४ जानेवारीपासून सुरुवात होणार असून ते दि. २१ जानेवारी पर्यंत दररोज स. ११ ते दु.३ वाजे पर्यंत स्विकारण्यात येणार आहेत. नामनिर्देशन पत्राची छाननी दि. २२ जानेवारी रोजी होणार असून उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दि.२४ जानेवारी हा आहे. निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दि. २५ जानेवारी असून त्याच दिवशी अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करावयाची आहे. सदर निवडणुकीसाठी दिनांक ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान होणार असून मतमोजणी दि. ७ फेब्रुवारी रोजी होणार आहे.



सदर निवडणूक प्रक्रियेसाठी स्टेडियम परिसर येथे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय स्थापन करण्यात आले असून निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून लतीफ पठाण, व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अरुण जाऱ्हाड, नांदेड आणि सहाय्यक आयुक्त गुलाम सादेक, मनपा हे काम पाहत असून मनपातील इतर अधिकारी व कर्मचारी हे देखिल निवडणुकीची कामे पार पाडत आहे.

दै लोकमत (10)

# मनपा पोटनिवडणुकीची प्रक्रिया आजपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : महापालिकेच्या प्रभाग १३ ड मदिनानगर-चौफाळा प्रभागाच्या पोट निवडणूक प्रक्रियेला १४ जानेवारीपासून सुरुवात होत आहे. २१ जानेवारीपर्यंत या पोटनिवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत.

महापालिकेच्या मदिनानगर-चौफाळा प्रभागाचे काँग्रेसचे नगरसेवक साबेर चाऊस यांनी आपल्या नगरसेवकपदाचा राजीनामा देऊन विधानसभा निवडणुकीत उडी घेतली होती. चाऊस यांनी एम.आय.एम. पक्षाकडून निवडणूक लढविली होती. त्यांनी राजीनामा दिल्यामुळे येथील नगरसेवकपद रिक्त झाले होते. या रिक्त पदासाठी निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. १४ ते २१ जानेवारी या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी तीन वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र स्वीकारले जाणार आहेत. उमेदवारी अर्जाची छाननी २२ जानेवारी रोजी होईल. २५ जानेवारी रोजी उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल. ६ फेब्रुवारी रोजी या प्रभागात मतदान होणार आहे. तर मतमोजणी ७ फेब्रुवारी रोजी होईल.

नांदेडचे उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून नांदेडचे तहसीलदार अरुण जऱ्हाड आणि सहाय्यक आयुक्त गुलाम सादेक हे काम पाहत आहेत.

### काँग्रेसने मागविले अर्ज

- मदिनानगर-चौफाळा प्रभागाच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसने इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविले आहेत. या प्रभागातून काँग्रेसकडून निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांची संख्या मोठी आहे.
- एम.आय.एम.कडून या प्रभागात साबेर चाऊस यांना उमेदवारी दिली जाते की अन्य कुणाला संधी मिळते याकडेही लक्ष लागले आहे.

# मनपा प्रभाग १३-ड च्या पोटनिवडणूक; आजपासून अर्ज स्वीकारणार

## काँग्रेसने मागविले इच्छुकांचे अर्ज

दै. अजिंक्य (6)

# नांदेड महानगरपालीका पोट निवडणुकीसाठी नामनिर्देशन प्रक्रिया सुरू

दै. भास्कर (7)

# महानगरपालिका उपचुनाव के लिए नामनिर्देशन पत्र प्रक्रिया आज से

दै. लोकमत (8)

# पोटनिवडणुकीसाठी आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात

नांदेड : प्रतिनिधी

